**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०५ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **'समुद्र प्रताप' या भारतीय तटरक्षक दलाच्या पहिल्या प्रदूषण नियंत्रण जहाजाचं जलावतरण संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते संपन्न.**
2. **उमेदवार बिनविरोध निवडून आलेल्या ठिकाणी मतदारांचा नोटाचा अधिकार अबाधित ठेवण्याची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी.**
3. **नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३००४ मतदान केंद्रांची स्थापना, झोननिहाय मतमोजणी १० ठिकाणी होणार.**
4. **विदर्भात थंडी परतली, आगामी काही दिवसांत तापमानाचा पारा आणखी घसरण्याची शक्यता.**

----------------------------------------

समुद्र प्रताप'

कोणतंही राष्ट्र केवळ संसाधनं, तंत्रज्ञान किंवा आर्थिक सामर्थ्यावर महान ठरत नाही, तर राष्ट्राची खरी ताकद त्याच्या मूल्यांवर आधारित आदर्शांवर ठरते', असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी केलं. गोव्यात आज ‘समुद्र प्रताप' या भारतीय तटरक्षक दलाच्या पहिल्या प्रदूषण नियंत्रण जहाजाचं जलावतरण राजनाथ सिंग यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. समुद्र प्रताप हे नाव समुद्राच्या प्रतिष्ठा, शक्ती आणि संरक्षणाचं प्रतीक असून, हे जहाज तटरक्षक दलाचा तसंच भारताचा आत्मविश्वास वाढवेल, असं त्यांनी नमूद केलं. या जहाजाबद्दल माहिती देताना ते म्हणाले,....

***(होल्ड बाईट - संरक्षण मंत्री राजनाथ सिंग-३५ सेकंद)***

***समुद्र प्रताप भारत की पहली स्वदेशी रूप से डिजाइन की गई है पोल्लुशन कंट्रोल वेसल है और कोस्टगार्ड फ्रिज की अबतक की सबसे बड़ी यह पोत है। 4170 टन का इसस्प्लेसमेंट और 115 मीटर की लंबाई अपने आप में इसकी विशालता को दिखाती है 22 नाइट्स की स्पीड इसकी ऑपरेशनल टेंथ को दर्शाती है। इसमें ऐडवान्स पल्यूशन डिटेक्शन सिस्टम, डेडिकेटेड पोल्लुशन रिस्पॉन्स ब्लॉक्स और***

***आधुनिक फाइर फाइटिंग कैपेबिलिटी भी मौजूद है, जिससे इसकी रीच और इफेक्टिवनेस कई गुना बढ़ जाती।***

'समुद्र प्रताप'मुळे भारतीय तटरक्षक दलाच्या प्रदूषण प्रतिसाद, अग्निशमन आणि सागरी सुरक्षा क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होणार असून, यामुळे आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमांना अधिक बळ मिळणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

-----------------------------------------

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष

महानगरपालिका निवडणुकीत महायुतीन आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणल्याचा, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निषेध केला. हे उमेदवार लोकप्रिय आहेत, म्हणून बिनविरोध निवडलेले नसून पैसा आणि दांडगाईच्या जोरावर झालेले आहेत, अशी टीका सपकाळ यांनी केली आहे. मुंबईत पत्रकार परिषदेत ते बोलत होते.याशिवाय जिथे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे, तिथे देखील नोटाचा अधिकार अबाधित ठेवावा असं सपकाळ म्हणाले.........

***(होल्ड बाईट-हर्षवर्धन सपकाळ - ३३ सेकंद)***

***आज अनअपोज निवडुका झाल्या असल्या तरी नोटाचा जो अधिकार आहे तो आबादीत आहे त्यामुळे नोटाचा अधिकार हा सपोज झालेल्या ठिकाणी जो निवडून आलाय. हा सोडून हा जो ऑप्शन आहे तो दाबण्याचा अनुषंगानं तिथे मशीन ठेवावी. मतदानाच्या दिवशी निवडणुका होत असताना लोकांना या सगळ्या प्रक्रियेला विशेष नोंद होता यावा किंवा त्यांना त्यांचा अधिकार जो आहे तो मतदानाचा वापरता यावा म्हणून निवडणूक आयोगांनी त्या दिवशी तिथे ते अनअपोज झाले असले तरी नोटा या ऑप्शन बटन आणि मशीनच्या ठिकाणी ठेवावी ही कॉंग्रेस पक्षाची आमची मागणी आहे.***

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले बहुतांश अधिकारी हे भ्रष्ट असल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला. या संदर्भातला अहवाल मिळूनही निवडणूक आयोगान कुठलीही कारवाई केलेली नाही, त्यामुळे या संदर्भात कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली.

-----------------------------------------

नवीन बसेस

सन २०२६ अखेर, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ८ हजार नवीन बसेस दाखल होतील, अशा पद्धतीन सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया

तातडीन गतिमान करण्यात यावी. यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिल्या आहेत. ते एसटी महामंडळाच्या सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत बोलावलेल्या आढावा बैठकीत बोलत होते.

-----------------------------------------

दिल्ली दंगल

२०२० सालच्या दिल्ली दंगल प्रकरणातले आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांची, 'जामीन याचिका' सर्वोच्च न्यायालयान फेटाळली आहे. या आरोपींविरोधात गैरकायदेशीर कृत्ये अधिनियम म्हणजेच यूएपीए अंतर्गत प्रथम दर्शनी ठोस पुरावे आहेत, असं न्यायालयानं सांगितलं. मात्र याच प्रकरणातील इतर पाच आरोपींना न्यायालयान जामीन मंजूर केला आहे. फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा विधेयकाविरोधात झालेल्या आंदोलनात ५३ जणांचा मृत्यू झाला होता.

-----------------------------------------

व्हीबी_जीरामजी

व्हीबीजी रामजी जनजागरण अभियानासाठी भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश समितीची नियुक्ती करण्यात आली असून, किसान मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री खासदार डॉ.अनिल बोंडे, संयोजक म्हणून जबाबदारी सांभाळतील. भारतीय जनता पार्टीन जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार या समितीत किसान मोर्चाचे प्रदेश महामंत्री मकरंद कोरडे, आमदार सत्यजित देशमुख, आमदार राजेश बकाने तसच उद्योग आघाडीचे प्रदेश सहसंयोजक निमेश असावे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

-----------------------------------------

आंतर-परिमंडळीय क्रीडा स्पर्धा

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी 'महापारेषण'तर्फे राज्यस्तरीय आंतर-परिमंडळीय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन दिनांक ७ ते ९ जानेवारी २०२६ दरम्यान नागपूर इथं करण्यात आल आहे. या स्पर्धांच उद्घाटन ७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता काटोल रोड येथील पोलीस कवायत मैदानावर महापारेषणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या उपस्थितीत होणार आहे.

-----------------------------------------

मतमोजणी

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली मनपा मुख्यालयात राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक पार पडली. मतमोजणी झोननिहाय १० ठिकाणी होणार असल्याचं स्पष्ट करण्यात आल. या निवडणुकीत एकूण ९९३ उमेदवार रिंगणात असून पारदर्शक आणि मुक्त निवडणूक घेण्यासाठी मनपाची संपूर्ण तयारी झाल्याच सांगण्यात आल आहे . राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शहरात ३००४ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. मतदान केंद्र आणि उमेदवारांची माहिती मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध राहणार असून, मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

-----------------------------------------

मतदान आवाहन

दिनांक १५ जानेवारी रोजी महानगर पालिकांसाठी सार्वत्रिक मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती शहरातील प्रत्येक पात्र मतदारान निर्भय आणि निष्पक्ष वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावावा, अस आवाहन, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी केल आहे. -

***(होल्ड बाईट - सौम्या शर्मा चांडक ३० सेकंद)***

***येणारे 15 जानेवारी ला अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक आहे. या निवडणूक भविष्यात अमरावती शहराला विकास दिशा देणारा असल्यामुळे सर्व नागरिकांना विनंती करते की तुम्ही या निवडणुकीत निश्चितपणे निर्भयपणे व उत्साहाने मतदान करावे.विशेषतः माझी सर्व आपले शहराच्या नवीन युवक मतदारांना अशी विनंती आहे. तुम्ही या निवडणुकीत नक्की मतदान करा आणि आपले शहराची लोकशाही बळकट करण्यासाठी प्रयत्न करा.***

-----------------------------------------

अक्षय्य ऊर्जा

गेल्या वर्षात भारताच्या उर्जा क्षेत्रात भरीव अशा सुधारणा झाल्या. अक्षय्य उर्जेकडे वाटचाल करताना भारतान २०२५ या वर्षात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुधारणांची अंमलबजावणी केली. याविषयी आता सविस्तर ऐकुया...

***(व्हीसी- नम्रता फलके)***

*'शांती' या अणुविषयक विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर अणुउर्जा क्षेत्र खासगी सहभागासाठी खुल करण्यात आल आहे. या निर्णयामुळे अणुउर्जा उत्पादनात १२ ते १४ पट वा होण्याची शक्यता असून, जीवाश्म इंधनांमुळे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट अपेक्षित आहे.अखंडित आणि सुरक्षित ऊर्जा पुरवठ्यासाठी पायाभरणी करत असतानाच भारताने सौर आणि पवन ऊर्जेलाही समान महत्त्व दिल . ऊर्जा उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या खनिजांच्या उपलब्धतेकडेही विशेष लक्ष देण्यात आल. राष्ट्रीय खनिज अभियानांतर्गत या धोरणासाठी सुमारे ३२ हजार कोटी रुपयांचा सार्वजनिक निधी मंजूर करण्यात आला आहे. या उपक्रमात अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, एअरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या २४ महत्त्वाच्या खनिजांचा समावेश करण्यात आला आहे. (आकाशवाणी बातम्यांसाठी नागपूर वृत्त विभागतून मी नम्रता फलके)*

-----------------------------------------

मतदान जनजागृती

नागपूर मनपाच्या मतदान जनजागृती स्वीप अभियानांतर्गत प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालयात मतदान जागृतीपर रांगोळी स्पर्धेच आयोजन करण्यात आलं. या स्पर्धेत बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी प्रणाली रामटेके हिन प्रथम क्रमांक पटकाविला. महाविद्यालयातील विविध पदवी अभ्यासक्रमातील १६ विद्यार्थिनींनी मतदान जनजागृतीचा संदेश रांगोळीच्या माध्यमातून प्रभावीपणे साकारला.

-----------------------------------------

हवामान

तीन-चार दिवस सातत्यान ढगाळ वातावरण असल्यामुळ किमान तापमानात लक्षणीय वाढ नोंदवल्यानंतर आज पुन्हा विदर्भात थंडी परतली आहे. भंडारा इथं सर्वात कमी १० अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं, तर गोंदिया इथं १० पूर्णांक ६, वर्धा इथं १३ पूर्णांक ४ आणि नागपुर इथं १३ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आगामी काही दिवस किमान तापमानात आणखी घट होऊ शकते, असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागान वर्तवला असून या दरम्यान हवामान कोरडं राहणार आहे.

-----------------------------------------